जा.क्र.वि.प्र-३/गवैविका/मा.सु./ २३१/२०१३.
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५, दिनांक - २६ /०५/२०१३

**प्रति,**
**विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)------------**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)--------**

**विषय :- राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम - सन २०१३-१४ - मार्गदर्शक सूचना**

राज्यातील वैरणीच्या उत्पादनाला गती देण्यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम (Accelerated Fodder Development Programme - AFDP) सन २०१३-१४ मध्ये राबविण्यासाठी मंजूर केलेला आहे. आपले स्तरावरुन कार्यवाहीसाठी कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचना पाठविण्यात येत आहे. शासन निर्णय प्राप्त झाल्यानंतर काही बदल असल्यास कळविण्यांत येतील.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियोजनाची कार्यवाही सत्वर करण्यात यावी.

**सोबत :- वरीलप्रमाणे**

**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, म.रा.पुणे-५**

**प्रतः-**
१)मा.प्रधान सचिव(कृषि व फलोत्पादन) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२)मा.आयुक्त (कृषि) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुण-१
३)मा.आयुक्त, (दुग्धव्यवसाय विभाग) मुंबई
४)मा.महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
५)व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उदयोग. विकास महामंडळ, मुंबई
६)व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, बियाणे महामंडळ, अकोला
७)संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी
८)संशोधन संचालक डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यपिठ, अकोला
९)संशोधन संचालक मराठवाडा कृषि विद्यापिठ, परभणी
१०)संशोधन संचालक,डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ दापोली
११)कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व)
१२)मा.संचालक,कृषि प्रक्रिया व नियोजन कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३)मा.संचालक, गुणनियंत्र व निविष्ठा, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

www.mahaagri.gov.in

## मार्गदर्शक सूचना

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम -२०१३-१४

**प्रस्तावना :-**

पशुधनाचे संगोपन,उत्पादन, वाढ तसेच दुग्धोत्पादन इत्यादीसाठी पशुधनाच्या आहारात हिरव्या व सुक्या वैरणीचे महत्व अनन्यसाधारण आहे. संगोपनात शेतकऱ्यांना पशुधनाच्या आहारावर ६० ते ७० टक्के पर्यंत खर्च करावा लागतो. अधिक दुग्धोत्पादनासाठी दुभते जनावरांना दैनंदिन आहारात हिरवी व सुकी सकस वैरण प्रमाणत देणे आवश्यक आहे.

पशुधनाच्या हिरव्या व सुक्या वैरणीची तसेच खाद्याची गरज आणि उपलब्धता लक्षात घेता दरवर्षी हिरव्या वैरणीची ७६ टक्के, सुक्या वैरणीची ३४ टक्के तर पशुखाद्यची ४३ टक्के तूट भासत असल्याचे दिसुन आले आहे.राज्यात सर्वसाधारण पर्जन्यमान असले तरी पशुधनासाठी वैरणीची तूट कमी अधिक प्रमाणत दरवर्षी जाणवते. राज्यामध्ये वैरणीची कमतरता काही प्रमाणात भरून काढणे तसेच पशुपालकांकडील पशुधनाची उत्पादकता वाढविणे व जास्तीत जास्त दुग्धोत्पादनासाठी पशुपालकांना पुरेशी हिरवी वैरण उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या शेतावर वैरणीचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरीता केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत गतिमान वैरण विकास योजना **(Accelerated Fodder Development Programme -AFDP)** सन २०११-१२ पासुन राबविण्यात येत आहे.

**प्रकल्प आधारीत कार्यक्रम :-**

सन २०१३-१४ मध्ये ही योजना खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात राज्यातील सर्व ३३ जिल्हयांमध्ये राबवावयाची आहे. यासाठी शासनाने रु.२५००.०० लाखाच्या कार्यक्रमास दिनांक २३/०५/२०१३ राजीच्या एसएलएससी च्या बैठकिमध्ये मंजूरी देण्यात आलेली आहे. हा कार्यक्रम प्रकल्प स्वरुपात राबवावयाचा असून, प्रत्येक प्रकल्प हा ५०० हेक्टरचा निश्चीत करण्यात आलेला आहे.

**योजनेमध्ये समाविष्ट घटक** :- या योजनेअंतर्गत राबवावयाचे घटक खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | घटक | रक्कम (रु. लाखात) |
|---|---|---|
| १ | मुलभुत व पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम व तंत्रज्ञान आधारित प्रात्यक्षिके | ४० |
| २ | वैरण विकास प्रात्याक्षिके कार्यक्रम | १,९६८ |
| ३ | सुयोग्य काढणीपश्चात व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब | ४९२ |

चारा पिकाचे मोठया प्रमाणात, चारा पिकाचे नविन तंत्रज्ञान प्रसार आणि चारा पिकांचे मुल्यवृध्दी या बाबी अतिशय महत्वाच्या आहेत.त्यासाठी वरील अ.क्र .२ व ३ मधील बाबींचा जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक कार्यक्रम सोबत प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब मध्ये दिलेला आहे.

**1) मुलभूत/पायाभुत बियाणे उत्पादन कार्यक्रम व तंत्रज्ञान आधारित प्रात्यक्षिके :-**

गतिमान वैरण विकास कार्यक्रमांतर्गत विविध चारा पिकांचे मुलभुत/पायाभूत बियाणे उत्पादन कार्यक्रम कृषि विद्यापिठांचे प्रक्षेत्रावर हाती घ्यावयाचा असुन सदर कार्यक्रमांतर्गत दुहेरी उपयोगाच्या पिकांचा(धान्य व चारा)प्राधान्याने समावेश करण्यात यावा. (उदा.ज्वारी, बाजरी, मका, चवळी इ.) त्याचप्रमाणे कृषि विद्यापिठां च्या प्रक्षेत्रावर तंत्रज्ञान आधारीत पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन करावयाचे आहे. पिक प्रात्याक्षिके १.०० हेक्टर क्षेत्राचे असावे. या संदर्भात महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहुरी, जि. अहमदनगर, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला व मराठवाडा

www.mahaagri.gov.in

कृषि विद्यापिठ, परभणी यांनी खालीलप्रमाणे बाबनिहाय सविस्तर प्रस्ताव तयार करुन कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना सादर करावा. कृषी विद्यापिठ व खाजगी संस्था यांचे भागिदारीने चारा पिकाचे बियाणे ऊत्पादन कार्यक्रम राबविणेत यावा तसा प्रस्ताव त्यांनी आयुक्तालयास सादर करावा.याच धरतीवर राज्यातील कृषि विभागाकडील तालुका बिजगुणन प्रक्षेत्रावर पायाभूत चारा बियाणे उत्पादन कार्यक्रम व प्रात्याक्षिके आयोजित करणेत येतील.

2) **वैरण उत्पादनाची समुहप्रात्यक्षिके :-**

राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये उपलब्ध असलेल्या पशुधनाच्या संख्येवर आधारित चारा उत्पादनाचे १२३ गट प्रात्याक्षिकांचे/प्रकल्प प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब मध्ये दिलेली आहेत. त्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आपल्या जिल्हयातील पशुधनाची संख्या विचारात घेवून प्रकल्पाचे नियोजन करावे.

## पिक प्रात्यक्षिकांसाठी निविष्ठा संच : -

चारा पिकाचे प्रात्यक्षिक एक हेक्टरचे असुन त्याची एकुण अनुदान मर्यादा रु.३२००/- हेक्टर निश्चित करण्यात आलेली आहेत.त्याचा बाबनिहाय तपशिल पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| बाब | परिमाण(किलो/हेक्टर) | अनुदान मर्यादा (रूपये) |
|---|---|---|
| बियाणे /ठोंबे | शिफारशीनुसार | १,००० |
| बिज प्रक्रिया जिवाणुखतासह | शिफारशीनुसार | ५०० |
| डिएपी,युरिया,सुक्ष्म अन्नद्रव्य | शिफारशीनुसार | १,५०० |
| इतर निविष्ठा | गरजेनुसार | २०० |
| एकूण | | ३,२०० |

जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशी व मंजूरी घेऊन स्थानिक परिस्थितीनुसार निविष्ठा संचामध्ये बदल करण्यात यावे. निविष्ठामधील बियाणेची रक्कम प्राधान्याने पुर्ण अदायगी होईल असे पहावे.

**1) शेतकऱ्यांची निवड : -**

१) प्रत्येक प्रात्यक्षिक किमान ०.२० हेक्टर व जास्तीत जास्त १ हेक्टर क्षेत्राच्या सलग क्षेत्रावर असावे.

२) अनुसुचित जाती/जमाती, भटक्या विमुक्त जमाती प्रवर्गातील शेतकरी, महिला शेतकरी, शेतक-यांचे गट,
स्वयंसहाय्यता गट यांना योजनेअतंर्गत निवडीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

३) लाभार्थीकडे स्वतःची शेतजमिन असणे आवश्यक आहे.

४) शेतक-यांची निवड करताना ग्रामपंचायत/सहकारी दुग्धव्यवसाय संस्था यांचा सहभाग घेणे आवश्यक आहे.

५) प्रत्येक २० शेतक-यांच्या समुहामध्ये एका प्रगतीशिल शेतक-यांची/प्रगतीशिल चारा उत्पादकाची गट प्रमुख म्हणून निवड करुन संपुर्ण प्रकल्पातील गट प्रमुख यादी व त्यांचे फोन क्रमांक प्रकल्प आराखडयात समावेश करावा.

६)एका लाभार्थीस एकच प्रात्यक्षिक देण्यात यावे व किमान २ ते ३ पशुधनाची संख्या आहे अशा लाभार्थींना प्राधान्य द्यावे. दुभत्या जनावराचा समावेश असणाऱ्या लाभार्थ्याला प्राधान्य देण्यात यावे.

**2) चारा पिकाची निवड :-**



www.mahaagri.gov.in

**या कार्यक्रमांतर्गत ज्वारी, मका, बाजरी, बरसीम, लुसर्न या पिकांचे बियाणे किंवा नेपियऱ यशवंत, जयवंत,बायफ-१० इ. सुधारीत बहुवर्षिय गवत प्रजातींची ठोंबे वाटप करावीत**. या पिकांव्यतिरिक्त इतर पिकांची निवड करावयाची झाल्यास जिल्हा स्तरीय सनियंत्रण समिती चर्चा करुन अशा पिकांसाठी आवश्यक निविष्ठा व लागवड पध्दती निश्चित कराव्यात. मात्र निविष्ठा संचाचा लाभ रु ३२००/- प्रति हेक्टर पेक्षा जास्त असणार नाही यांची दक्षता घ्यावी.

**3) कार्यक्रमाची अमंलबजावणी:-**

१)प्रत्येक ५०० हेक्टर क्षेत्राच्या प्रकल्पात वैरण उत्पादन कार्यक्रमासाठी संबंधित मंडळ कृषि अधिकारी यांची प्रकल्प अधिकारी म्हणून जबाबदारी राहील. सदर कार्यक्रमाचे संनियंत्रण प्रकल्प अधिकारी यांनी करणे अनिवार्य आहे.

२) प्रात्याक्षिकासाठी वैरण पिकाची निवड हंगामानुसार करावी.

३) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), राष्ट्रीय बियाणे महामंडळ, कृषि विद्यापिठे,ताबीके,व इतर शासकीय संस्था यांचेकडून उपलब्धतेनुसार बियाणे व ठोंबे खरेदी करावी. पशुसंवर्धन विभागाने केलेल्या दर करारानुसार सुद्घा आवश्यकतेनुसार बियाण्याची खरेदी करता येईल.

४)निविष्ठा वाटपासाठी शेतकऱ्याच्या मागणीचा अर्ज, निविष्ठा प्राप्त झाल्याची पावती व उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात यावे तसेच इतर आवश्यक त्या नोंदी तालुका/मंडळ/कृषिसहाय्यक स्तरावर लाभार्थीनिहाय रजिस्ट्रमध्ये ठेवण्यात याव्यात.

५)प्रकल्प निहाय सध्याची चारा पिक पध्दती, क्षेत्र उत्पादन, उत्पादकता,सुक्या व हिरव्यावैरणीच्या उपलब्धतेमधील कमतरता, जनावरांची संख्या, दुग्धोत्पादन यांची सांख्यिकी माहिती पशुसंवर्धन विभागातील क्षेत्रीय अधिका-यांच्या मदतीने गोळा करावी व प्रकल्प आराखडयात याचा समावेश करुन आवश्यक त्याचा नियोजना प्रमाणे उपलब्धता कमी करावी.

६) गतिमान वैरण विकास कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या प्रकल्पातील पिक प्रात्यक्षिकांच्या आयोजनामुळे शेतकऱ्यांच्या शेतावर झालेले वैरण उत्पादन, उपलब्ध झालेल्या वैरणीमुळे जनावराच्या वाढीवर झालेला परिणाम, दुध उत्पादनात झालेली वाढ इ. माहिती तालुकास्तरावर पशुसंवर्धन/ दुग्धव्यवसाय विभाग यांच्या मदतीने हंगाम संपल्यावर माहितीचे संकलन करावे.

७) भरडधान्य विकास योजना व वैरण विकास योजना मध्ये यापूर्वी लाभ दिलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येऊ नये तसेच या योजनेचा एकदा लाभ दिल्यानंतर त्याच लाभार्थ्याला पुन्हा लाभ देण्यात येऊ नये. कार्यक्रमाचे प्रकल्प शक्यतोवर एकाच तालुक्यात घेण्यात येऊ नयेत.दोन्ही प्रकल्पातील गावे ही स्वतंत्र असावीत. कोणत्याही दोन योजनांसाठी एक गाव असू नये याची दक्षता घ्यावी.

८)प्रत्यक्ष क्षेत्र व्याप्तीनुसारच अनुदान देय राहील.

९)या योजनेमधून चारा पिकाची निवड करताना जास्तीत जास्त पेरिनियल चारा पिकांचा अंतर्भाव करावा.

१०)ज्या प्रकल्प क्षेत्रात भरडधान्य कार्यक्रमांतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत अशा ठिकाणी वैरण विकास योजने अंतर्गतचे प्रकल्प / कार्यक्रम घेण्यात येऊ नये.

११)निविष्ठांचे पुरवठा पश्चात तपासणी करुन घेऊन नंतरच अदायगी करावी.

१२)सुयोग्य काढणी पश्चात व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब या बाबी अंतर्गत वाटप करावयाची अवजारे प्रकल्पासाठी निवडलेल्या लाभधारकांनाच वाटप करता येतील.

**4) प्रशिक्षण :-**

www.mahaagri.gov.in

वैरण पिक प्रात्याक्षिकांसाठी निवड केलेल्या लाभार्थ्यांना तसेच मंडळ कृषि अधिकारी / कृषि सहाय्यक यांना कृषि विभागाच्या इतर योजनांतर्गत उपलब्ध निधीतून कृषि विद्यापिठ स्तरावर तज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी. मंडळ कृषि अधिकारी यांचे प्रशिक्षण कृषि विद्यापिठ स्तरावर घेण्यात यावे. तर कृषि सहाय्यक व शेतक-यांच्या गट प्रमुखाचे प्रशिक्षण विभागीय कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती)/कृषि चिकित्सालय/कृषि विज्ञान केंद्र तसेच जिल्हा प्रशिक्षण केंद्र ( जागतिक प्रकल्प) या स्तरावर घेण्यात यावे.

**5) निविष्ठा खरेदी समिती :-**

निविष्ठा खरेदी करणे करीता व संनियत्रण करणे करीता विभागीय कृषि सह संचालक यांचे अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१) विभागीय कृषि सह संचालक — अध्यक्ष्य

२) कृषि विद्यापीठांचे संबधित विषयाचे शास्त्रज्ञ — सदस्य

३) बियाणे महामंडळ ,राष्ट्रीय बीज निगम, कृषि उदयोग विकास महामंडळ, मार्कफेड संस्थेचे स्थिानिक प्रतिनिधी — सदस्य

४) संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी — सदस्य सचिव

पिक प्रात्यक्षिके राबविण्यासाठी निविष्ठा खरेदी करावयाच्या आहेत त्या निविष्ठासाठी सर्व निविष्ठांची मान्यतेनुसार पुरवठादार संस्थेकडे मागणी नोंदविण्यात येऊन त्याची एक प्रत आयुक्तालयास सादर करावी. सर्व निविष्ठा व औजारे वेळेत उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सह संचालक यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत पुरवठा केलेल्या निविष्ठा पडून रहाणार नाहीत याची दक्षता संबंधित विभागीय कृषि सह संचालक यांनी घ्यावी.

विभागीय कृषि सह संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समितीची मान्यता घेऊन निविष्ठा पुरवठा आदेश संचालक (निवगुनि) यांनी निश्चित केलेल्या पुरवठादार संस्थेकडे मागणी नोंदविण्यात यावी. निविष्ठाची निश्चिती करताना निविष्ठा शिफारस केलेल्या मात्रानुसार घेण्यात याव्यात आणि अनुज्ञेय असलेले अनुदान वजा जाता उर्वरित रक्कम लोकवाटा म्हणून शेतकऱ्याकडून घेऊन संबंधित संस्थेकडे भरणा करावी.

**6) सुयोग्य काढणीपश्चात व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा अवलंब :-**

या बाबीअंतर्गत निवडलेल्या प्रकल्पांत सुधारीत कृषि अवजारांचे वाटप आणि मुरघास तयार करण्यासाठी सायलो आणि स्वयंचलित कडबाकुट्टी यंत्र(पॉवर ड्रीवन चापकटर) उपलब्ध करून देण्याचा समावेश आहे.सदर कार्यक्रमात खालीलप्रमाणे अवजारे स्थानिक परिस्थितीनुसार देण्यात यावीत.

| अ.क्र. | नांव | प्रकार | अंदाजीत किंमत रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सुधारीत विळा | हस्तचलित | ८० | आयसीअेआर प्रमाणे |
| २ | गवत कापणी यंत्र | हस्तचलित | १५० | -- |
| ३ | हस्तचलित कडबाकुट्टी | हस्तचलित | ४,००० | -- |
| ४ | कडबाकट्टी (३ पाती) | बैलचलित | १५,००० | -- |
| ५ | स्वयंचलित कडबा कुट्टी | १ ते २ एचपी मोटार | २०,००० | -- |

www.mahaagri.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मुरघास व संवयंचलित चापकटर | -- | १५०,००० | नोदणीकृत उत्पादकांकडून |
| ७ | चारा गट्टे तयार करण्याचे यंत्र | -- | ४०,००० | सीआयअैई, भोपाळ पद्घतीचा |

निवडलेल्या प्रत्येकी ५०० हेक्टर क्षेत्रव्याप्ती असलेल्या प्रकल्पात रू. ४.०० लाख या मर्यादेत तालुकास्तरीय समितीच्या शिफारस व इत्तीवृत्तासह प्राप्त प्रस्तावास जिल्हास्तरीय समितीमार्फत अवजारांची निवड करून त्यानंतर पुरवठा आदेश गटाच्या मागणीनुसार देण्यात यावे.

**प्रकल्पनिहाय प्रकल्प क्षेत्रात खालीलप्रमाणे औजारोंचे वाटप करता येतील**

| अ.क. | औजारांची नावे | औजारांची संख्या | एकुण किमंत(रुपयात) |
|---|---|---|---|
| १ | हाताने चालणारी कडबाकुट्टी | २५ | १००,००० |
| २ | तीनब्लेडचे बैलचलीत चॉफ कटर | ६ | ९०,००० |
| ३ | चारा ब्लॉक तयार करण्याचे मशिन | १ | ४०,००० |
| ४ | यंत्रचलित चारा कुटी यंत्र | १ | १५०,००० |
| ५ | छोटी औजारे(विळा,कटर) | आवश्यकते नुसार | २०,००० |

या योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या वैरण उत्पादन प्रात्याक्षिक प्रकल्पांतच सुधारीत अवजारांचे वाटप करण्यात यावे. या घटकाअंतर्गत सुधारीत विळा, गवत कापणी यंत्र, हाताने चालणारी कडबाकुट्टी, यंत्रचलित चारा कुटी यंत्र यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जिल्हा व तालुकास्तरीय समितीच्या मान्यतेने व प्राप्त प्रस्तावास जिल्हा स्तरीय समितीची मान्यता घेऊन विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुबंई यांचेकडून अवजारे खरेदी करण्यात यावे.

## 7) कार्यक्रमांचे सनियंत्रण :-

या कार्यक्रमांच्या सनियंत्रणासाठी राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर समित्या गठीत केल्या असुन त्या खालील प्रमाणे असतील.

**अ) राज्यस्तरीय सनियंत्रण समिती**

| | | |
|---|---|---|
| १) | आयुक्त ( कृषि ) | अध्यक्ष |
| २) | आयुक्त ( पशुसंवर्धन ) | सहअध्यक्ष |
| ३) | आयुक्त ( दुग्धव्यवसाय ) | सदस्य |
| ४) | व्यवस्थापकीय संचालक (म.रा.कृ.उ.वि.म.) | सदस्य |
| ५) | व्यवस्थापकीय संचालक (म.रा.बि.म.) | सदस्य |
| ६) | संचालक ( विस्तार व प्रशिक्षण) | सदस्य |
| ७) | संचालक ( नि.व. गु.नि.) | सदस्य |
| ८) | संशोधन संचालक, कृषि वि'ापिठे (सर्व) | सदस्य |
| ९) | कृषि सहसंचालक ( विप्र) | सदस्य |
| १०) | कृषि उपसंचालक ( नगदी पिके) | सदस्य सचिव |

सदर समिती राज्यस्तरावर या कार्यक्रमाची अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी आढावा घेऊन विभाग व जिल्हास्तरीय यंत्रणाना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करेल आणि सहभागी यंत्रणामध्ये सुसूत्रता ठेवेल.

**ब) विभागस्तरीय सनियंत्रण समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय कृषि सहसंचालक | अध्यक्ष |

www.mahaagri.gov.in

| | | |
|---|---|---|
| २) | प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त | सदस्य |
| ३) | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी | सदस्य |
| ४) | प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र ( कृषि विद्यापिठ ) | सदस्य |
| ५) | विभागीय अधिकारी (म.रा.कृ.उ.वि.म.) | सदस्य |
| ६) | विभागीय अधिकारी(म.रा.बि.म.) | सदस्य |
| ७) | विभागीय अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य |
| ८) | तंत्र अधिकारी ( गुणनियंत्रण) | सदस्य |
| ९) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (संबंधित जिल्हा) | सदस्य सचिव |

सदर कार्यक्रमाअंतर्गत चारा पिक निहाय व मार्गदर्शक सूचनेतील घटकानुसार व दिलेल्या अनुदानाच्या मर्यादेत निविष्ठा निश्चिती करणे. निविष्ठा पुरवठा, सुधारीत अवजारांचा पुरवठा, त्यांचे गुणनियंत्रण आणि या कार्यक्रमाचे विभागीय स्तरावर सनियंत्रण या समितीने करावे.व सभेचे इतीवृत्त वेळोवेळी आयुक्तालयास सादर करावे.

**क) जिल्हास्तरीय सनियंत्रण समिती :**

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| २) | जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त | सदस्य |
| ३) | प्रकल्प संचालक , आत्मा | सदस्य |
| ४) | कृषि विकास अधिकारी, जि.प. | सदस्य |
| ५) | कृषि विद्यापिठ प्रतिनिधी | सदस्य |
| ६) | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ,जिल्हा प्रतिनिधी | सदस्य |
| ७) | महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ,जिल्हा प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी | सदस्य |
| ९) | दुग्ध उत्पादक शेतकरी/दुध उत्पादन संस्थेचे अध्यक्ष | सदस्य (जिल्हा स्तरीय आत्मा समिती) |
| १०) | कृषि विज्ञान केंद्र | सदस्य |
| ११) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक | सदस्य सचिव |
| १२) | जिल्हयातील १ उपविभागिय कृषी अधिकारी | सदस्य |

**जिल्हास्तरीय समितीच्या जबाबदा-या खलीलप्रमाणे रहातील.**

१.गतीमान वैरण विकास कार्यक्रमाचा विकास आराखडा तयार करणे आणि त्याचा राष्ट्रीय कृषि विकास योजनेंअतर्गत जिल्हा कृषि आराखडयात (DAP) समावेश करणे.

२.तालुकास्तरीय समितीच्या शिफारशी विचारात घेऊन वैरण विकासाच्या प्रकल्प क्षेत्रास व प्रकल्पांना (Projects) मान्यता देणे.

३.कार्यक्रमामध्ये सहभागी संस्था/यंत्रणा यांचे समन्वय ठेवुन कार्यक्रमाचे नियोजन करणे.

४.कृषि विद्यापीठाचे शिफारशींनुसार आणि तालुका स्तरीय समितीने निवड केलेल्या पिकानुसार चारा पिकनिहाय निविष्ठा संच ठरविणे.

५.योजनेंअतर्गत निविष्ठा संचांचा आणि कृषि अवजारांचा पुरवठा वेळेत होईल त्यानुसार वेळापत्रक तयार करुन निविष्ठा वाटपाची आखणी करणे.

६.निविष्ठा संच आणि सुधारित कृषि अवजारे यांच्या दर्जाची पुरवठा पश्चात मा. संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण यांचें मार्गदर्शक सूचनेनुसार खात्री करणे त्यासाठी निविष्ठांचे नमुने काढणे व ते तपासुन त्यानंतर प्रमाणित नमुन्याचे अनुदान अदायगी करणे

७.या कार्यक्रमातील  मंडळ कृषि अधिकारी (प्रकल्प अधिकारी) आणि चारा उत्पादकांच्या गट प्रमुखांना तसेच कृषि सहाय्यकांना प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

www.mahaagri.gov.in

८.या कार्यक्रमाच्या प्रकल्पाधारित विस्ताराच्या अंमलबजावणीचे संपुर्ण नियोजन, सनियंत्रण आणि मुल्यमापन करणे.

- **तालुका स्तरीय समिती**

| | |
|---|---|
| १) तालुका कृषि अधिकारी | : अध्यक्ष |
| २) कृषि अधिकारी पंचायत समिती | : सदस्य |
| ३) दुग्धउत्पादक शेतकरी (दोन प्रतिनिधी) | : सदस्य |
| ४) पशुधन विकास अधिकारी | : सदस्य |
| ५) तालुकास्तरीय अधिकारी (दुग्धविकास) | : सदस्य |
| ६) दुग्ध संस्था/संघ प्रतिनिधी | : सदस्य |
| ७) ता.कृ.अ.कार्यालयातील (कृषि अधिकारी) | : सदस्य सचिव |

**तालुकास्तरीय समितीच्या जबाबदा-या :-**

१. तालुकास्तरीय समितीच्या सदस्यांशी विचार विनिमय करुन तालुक्यातील चारा उत्पादनाच्या प्रकल्पांची जागेची निश्चिती करणे.

२. प्रकल्पाधारित विस्तार कार्यक्रम अपेक्षीत असलेने प्रकल्प राबविणेपूर्वी Baseline Survey करुन प्रकल्प आराखडे तयार करुन जिल्हास्तरीय समितीस सादर करुन तसी मान्यता घ्यावी.

३. या कार्यक्रमात सहभागी संस्था आणि यंत्रणा यांचेशी समन्वय ठेवुन तालुका स्तरावरील कार्यक्रमाचे नियोजन करणे.

४. कार्यक्रमांअतर्गत शेतक-यांना पुरवठा करावयाच्या निविष्ठा संच ठरविणे आणि सुधारित कृषि अवजारांची निवड करुन जिल्हास्तरीय समितीला शिफारस करणे.

५. योजनेंअतर्गत निविष्ठा संचांचा आणि सुधारित अवजारांचा पुरवठा वेळेवर व प्रकल्पातच होईल याचे नियोजन व सनियंत्रण करणे.

६. योजनेंअतर्गत निविष्ठा संचांचा आणि कृषि अवजारांचा पुरवठा वेळेत होईल यानुसार वेळापत्रक तयार करुन निविष्ठा वाटपाची आखणी करणे.

७. निविष्ठा संच आणि सुधारित कृषि अवजारे यांच्या दर्जाची पुरवठा पश्चात खात्री करणे.

८. या कार्यक्रमाचे मंडळ कृषि अधिकारी (प्रकल्प अधिकारी)आणि चारा उत्पादकांच्या गट प्रमुखांना तसेच कृषि सहाय्यकांना प्रकल्प राबविणे पूर्वी प्रशिक्षण दिलेबाबत खातरजमा करावी.

९. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे तालुकास्तरीय संपुर्ण नियोजन, संनियंत्रण आणि मुल्यमापन करणे.

## 8). योजनेअंतर्गत कामाची तपासणी :-

**योजनेवर झालेल्या खर्चाच्या तपासणीची विविध स्तरावरील टक्केवारी खालील प्रमाणे राहिल.**

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय कृषि सहसंचालक | :१ टक्का |
| २) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | :२ टक्के |
| ३) | कृषि विकास अधिकारी | :३ टक्के |
| ४) | उपविभागीय कृषि अधिकारी | :५ टक्के |
| ५) | तालुका कृषि अधिकारी | :२० टक्के |
| ६) | मंडल कृषि अधिकारी/कृषि अधिकारी पं.स. | :५० टक्के |
| ७) | कृषि पर्यवेक्षक/कृषि विस्तार अधिकारी/कृषि सहाय्यक | :१०० टक्के |

## 9) यशोगाथा:

www.mahaagri.gov.in

**राष्ट्रीय कृषि विकास योजनअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २०१३-१४ ( रु.लाख)**

**मासीक प्रगती अहवाल माहे -----**

**प्रपत्र -१**

सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये या योजनेचा शेतक-यांना मोठयाप्रमाणात लाभ झालेला असुन त्यांचे दुग्धोत्पादनात वाढ झालेली आहे. लाभधारकांच्या यशोगाथेला स्थानिक प्रसिध्दी देवून मराठी/हिंदी/इंग्रजी मध्येसीडी स्वरुपात यशोगाथा कृषि आयुक्तालयास सादर करावि.

**10) प्रगती अहवाल पाठविणेबाबत :-**

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रत्येक महिन्यात योजनेचा आढावा घेऊन जिल्हयाचा योजनेचा मासिक प्रगती अहवाल सोबतच्या प्रपत्र-१ ते प्रपत्र-३ मध्ये विभागीय कृषि सहसंचालक यांना पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यत सादर करतील. विभागीय कृषि सहसंचालक यांनी आपल्या विभागातील जिल्हयांचा संकलित मासिक प्रगती अहवाल ७ तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास सादर करतील. तसेच केंद्र सरकारने दिलेल्या इंग्रजी प्रपत्रातील माहिती देखील दर महिन्यास जिल्हानिहाय संकलित करुन वरील अहवाला सोबत आयुक्तालयास सादर करतील.

**कृषी संचालक( विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**

www.mahaagri.gov.in

**ठिकाण** **जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी**

**दिनांक :** **जिल्हा ------------**

## राष्ट्रीय कृषि विकास योजनअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २०१३-१४ ( रु.लाख)

| अ. क्र. | जिल्हा | प्रकल्प (संख्या) (५०० हेक्टर क्षेत्राचे) (भौतिक) | | क्षेत्र( हे. ) (भौतिक) | | वैरण उत्पादनाची गट प्रात्याक्षिके ( रु.३२००/- प्रति हेक्टर) आर्थिक | | सुयोग्य काढणी प्रश्चात व्यवस्थापन तंत्र अवलंब (प्रति प्रकल्प रु ४ लाख ) आर्थिक | | | | चारा पिकाचे ऊत्पादन (लाख मे.टन) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्षांक | साध्य | लक्षांक | साध्य | तरतूद | खर्च | लक्षांक | साध्य | तरतूद | खर्च | लक्षांक | साध्य |

**मासीक प्रगती अहवाल माहे-----**

**प्रपत्र -२**

| अ.क्र. | जिल्हा | कार्यक्रम राबविलेले | | लाभधारक(संख्या) | | | | निविष्ठा वाटप | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तालुके (संख्या) | गावे (संख्या) | अ.जाती | अ.जमाती | महिला | एकुण | निविष्ठाची नावे | निविष्ठा मागणी | पुरवठा |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

ठिकाण — जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी

दिनांक : — जिल्हा ------------

## राष्ट्रीय कृषि विकास योजनअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २०१३-१४ ( रु.लाख)
## सुयोग्य काढणीपश्चात व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा आवलंब
**मासीक प्रगती अहवाल माहे----------**

**प्रपत्र -३**

| अ. क्र. | अवजारांचे नाव | भैतिक (संख्या) | | आर्थिक (रु.लाखत) | | लाभधारक | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्य | साध्य | तरतुद | खर्च | अ.जाती | अ.जमाती | महिला | ईतर | एकुण |
| | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| | | | | | | | | | | |

www.mahaagri.gov.in

**ठिकाण** **जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी**

**दिनांक :** **जिल्हा ------------**

www.mahaagri.gov.in

## राष्ट्रीय कृषि विकास योजनअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २०१३-१४ मंडळ/तालुका/जिल्हा स्तरावर लाभार्थीनिहाय निविष्ठा वाटप व चारा उत्पादनाचा तपशील दर्शविणारी नोंदवही

### प्रपत्र -४

| अ.क्र. | गटाचे नाव | लाभधारकाचे नाव | दिलेल्या निविष्ठांची नावे | दिलेल्या निविष्ठा | लाभधारक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा. | अ.ज. | महिला | व इतर |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ठिकाण** **जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी**

**दिनांक :** **जिल्हा ------------**

| अ. क्रं | जिल्हे | प्रकल्प (संख्या) (५०० हेक्टर क्षेत्राचे) | क्षेत्र ( हे.) | वैरण उत्पादनाची गट प्रात्याक्षिके ( रु.३२००/-प्रति हेक्टर) | सुयोग्य काढणी प्रश्चात व्यवस्थापन तंत्र अवलंब (प्रति प्रकल्प रु ४.०० लाख ) | एकूण | | चारा पिकाचे उत्पादन लक्षांक (लाख मे.टन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आर्थिक तरतूद | आर्थिक तरतूद | प्रकल्प संख्या | आर्थिक तरतूद | |
| १ | ठाणे | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २ | रायगड | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३ | रत्नागिरी | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| कोकण विभाग | | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| ५ | धुळे | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ६ | नाशिक | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| ७ | नंदुरबार | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ८ | जळगांव | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| नाशिक विभाग | | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| ९ | अहमदनगर | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| १० | पुणे | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| ११ | सोलापूर | २ | १००० | ३२ | ०८ | २ | ४० | ०.३० |
| पुणे विभाग | | ९ | ४५०० | १४४ | ३६ | ९ | १८० | १.३५ |
| १२ | सातारा | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १३ | सांगली | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १४ | कोल्हापूर | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| कोल्हापूर विभाग | | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| १५ | औरंगाबाद | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १६ | जालना | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १७ | बीड | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| औरंगाबाद विभाग | | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| १८ | परभणी | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| १९ | लातूर | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २० | उस्मानाबाद | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २१ | नांदेड | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २२ | हिंगोली | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| लातूर विभाग | | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| २३ | अमरावती | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २४ | अकोला | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २५ | वाशिम | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २६ | बुलढाणा | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २७ | यवतमाळ | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| अमरावती विभाग | | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| २८ | नागपूर | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २९ | वर्धा | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३० | भंडारा | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३१ | गोदिया | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३२ | चंद्रपूर | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३३ | गडचिरोली | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| नागपूर विभाग | | ७ | ३५०० | ११२ | २८ | ७ | १४० | १.०५ |
| **एकूण राज्य** | | **४९** | **२४५००** | **७८४** | **१९६** | **४९** | **९८०** | **७.३५** |

www.mahaagri.gov.in

प्रपत्र-ब राष्ट्रीय कृषि विकास योजनअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २०१३-१४(रब्बी) ( रु.लाख)

| अ. क्रं | जिल्हे | प्रकल्प (संख्या) (५०० हेक्टर क्षेत्राचे) | क्षेत्र (हे. ) | वैरण उत्पादनाची गट प्रात्याक्षिके ( रु.३२००/-प्रति हेक्टर) | सुयोग्य काढणी प्रश्चात व्यवस्थापन तंत्र अवलंब (प्रति प्रकल्प रु ४ लाख ) | एकूण | | चारा पिकाचे उत्पादन लक्षांक (लाख मे.टन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तरतूद | तरतूद | प्रकल्प (संख्या) | आर्थिक (तरतूद) | |
| १ | ठाणे | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| २ | रायगड | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| ३ | रत्नागिरी | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| कोकण विभाग | | १ | ५०० | १६ | ४ | १ | १ | ०.१५ |
| ५ | धुळे | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| ६ | नाशिक | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| ७ | नंदुरबार | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ८ | जळगांव | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| नाशिक विभाग | | १० | ५००० | १६० | ४० | १० | २०० | १.५० |
| ९ | अहमदनगर | ७ | ३५०० | ११२ | २८ | ७ | १४० | १.०५ |
| १० | पुणे | ५ | २५०० | ८० | २० | ५ | १०० | ०.७५ |
| ११ | सोलापूर | ५ | २५०० | ८० | २० | ५ | १०० | ०.७५ |
| पुणे विभाग | | १८ | ८५०० | २७२ | ६८ | १७ | ३४० | २.५५ |
| १२ | सातारा | ५ | २५०० | ८० | २० | ५ | १०० | ०.७५ |
| १३ | सांगली | ५ | २५०० | ८० | २० | ५ | १०० | ०.७५ |
| १४ | कोल्हापूर | ५ | २५०० | ८० | २० | ५ | १०० | ०.७५ |
| कोल्हापूर विभाग | | १५ | ७५०० | २४० | ६० | १५ | ३०० | २.२५ |
| १५ | औरंगाबाद | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १६ | जालना | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १७ | बीड | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| औरंगाबाद विभाग | | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| १८ | परभणी | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| १९ | लातूर | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २० | उस्मानाबाद | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २१ | नांदेड | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २२ | हिंगोली | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| लातूर विभाग | | १० | ५००० | १६० | ४० | १० | २०० | १.५० |
| २३ | अमरावती | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| २४ | अकोला | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २५ | वाशिम | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २६ | बुलढाणा | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २७ | यवतमाळ | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| अमरावती विभाग | | ११ | ५५०० | १७६ | ४४ | ११ | २२० | १.६५ |
| २८ | नागपूर | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २९ | वर्धा | | ० | ० | ० | | ० | ० |
| ३० | भंडारा | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| ३१ | गोदिया | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| ३२ | चंद्रपूर | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३३ | गडचिरोली | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| नागपूर विभाग | | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| एकूण राज्य | | ७४ | ३७००० | ११८४ | २९६ | ७४ | १४८० | ११.१० |

www.mahaagri.gov.in

प्रपत्र – क राष्ट्रीय कृषि विकास योजनअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रम २०१३-१४(खरीप/रब्बी) ( रु.लाख)

| अ.क्रं | जिल्हे | प्रकल्प (संख्या) (५०० हेक्टर क्षेत्राचे) | क्षेत्र हे. | वैरण उत्पादनाची गट प्रात्याक्षिके( रु.३२००/- हे.) | सुयोग्य काढणी प्रश्चात व्यवस्थापन तंत्र अवलंब (प्रति प्रकल्प रु ४ लाख ) | एकूण | | चारा पिकाचे ऊत्पादन लक्षांक (लाख मे.टन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आर्थिक तरतूद | आर्थिक तरतूद | प्रकल्प संख्या | आर्थिक तरतूद | |
| १ | ठाणे | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| २ | रायगड | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३ | रत्नागिरी | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ४ | सिंधुदुर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ०.०० |
| कोकण विभाग | | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| ५ | धुळे | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| ६ | नाशिक | ६ | ३००० | ९६ | २४ | ६ | १२० | ०.९० |
| ७ | नंदुरबार | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| ८ | जळगांव | ५ | २५०० | ८० | २० | ५ | १०० | ०.७५ |
| नाशिक विभाग | | १६ | ८००० | २५६ | ६४ | १६ | ३२० | २.४० |
| ९ | अहमदनगर | ११ | ५५०० | १७६ | ४४ | ११ | २२० | १.६५ |
| १० | पुणे | ८ | ४००० | १२८ | ३२ | ८ | १६० | १.२० |
| ११ | सोलापूर | ७ | ३५०० | ११२ | २८ | ७ | १४० | १.०५ |
| पुणे विभाग | | २६ | १३००० | ४१६ | १०४ | २६ | ५२० | ३.९० |
| १२ | सातारा | ७ | ३५०० | ११२ | २८ | ७ | १४० | १.०५ |
| १३ | सांगली | ७ | ३५०० | ११२ | २८ | ७ | १४० | १.०५ |
| १४ | कोल्हापूर | ७ | ३५०० | ११२ | २८ | ७ | १४० | १.०५ |
| कोल्हापूर विभाग | | २१ | १०५०० | ३३६ | ८४ | २१ | ४२० | ३.१५ |
| १५ | औरंगाबाद | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| १६ | जालना | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| १७ | बीड | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| औरंगाबाद विभाग | | १२ | ६००० | १९२ | ४८ | १२ | २४० | १.८० |
| १८ | परभणी | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| १९ | लातूर | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| २० | उस्मानाबाद | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| २१ | नांदेड | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| २२ | हिंगोली | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| लातूर विभाग | | १६ | ८००० | २५६ | ६४ | १६ | ३२० | २.४० |
| २३ | अमरावती | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| २४ | अकोला | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| २५ | वाशिम | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| २६ | बुलढाणा | ३ | १५०० | ४८ | १२ | ३ | ६० | ०.४५ |
| २७ | यवतमाळ | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८०० | ०.६० |
| अमरावती विभाग | | १७ | ८५०० | २७२ | ६८ | १७ | ३४० | २.५५ |
| २८ | नागपूर | ४ | २००० | ६४ | १६ | ४ | ८० | ०.६० |
| २९ | वर्धा | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३० | भंडारा | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३१ | गोदिया | १ | ५०० | १६ | ४ | १ | २० | ०.१५ |
| ३२ | चंद्रपूर | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| ३३ | गडचिरोली | २ | १००० | ३२ | ८ | २ | ४० | ०.३० |
| नागपूर विभाग | | ११ | ५५०० | १७६ | ४४ | ११ | २२० | १.६५ |
| **एकूण राज्य** | | **१२३** | **६१५००** | **१९६८** | **४९२** | **१२३** | **२४६०** | **१८.४५** |

www.mahaagri.gov.in